FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154128

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. २०, वर्ष Year २०२१, दिनांक Date ०१.०८.२०२१

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day मंगळवार तारीख पासून Date from २६/०२/२०२१ वेळ Time १२.२५ तारीख पर्यंत Date to ३१/०२/२१ वेळ Time १२१३.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २६/०२/२०२१, वेळ Time १०.००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२०२१, तारीख Date ०१/०८/२०२१ वेळ Time ०२.३० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name कार्यकारी अभियंता 'अ' विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना (म्हाडा) मंडळ, कफ परेड — ठिकाणाचे क्र. No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मुंबई, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. ........, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अब्दुल बशर मोहीत खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मोहीत खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८२१८३३४८०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation बांधकाम कंत्राटदार
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : उमर हाऊस रूम नं २४, ४था मजला, टांडेल क्रॉस लेन, डोंगरी — गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., गटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road मस्जिद बंदर नजिकचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place डोंगरी, गाव Village मुंबई, पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई- ४००००९ राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   राजकुमार हणमंत वकडे, वय ५३ वर्षे, धंदा- नोकरी (शाखा अभियंता) नेमणूक- कार्यकारी अभियंता 'अ' विभाग यांचे कार्यालय (म्हाडा) मुंबई, रा. बी-सुविधा बिल्डींग फ्लॅट नं २०९, १० फूट रस्ता, केळकर कॉलेज समोर, मुलुंड (पू), मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

खालील फिर्यादी अब्दुल बशर खान, रा. बी. उमर हाऊस रूम नं 28, 8 वा मजला, लांडेल क्रॉस लेन, डोंगरी, मस्जिद बंदर, मुंबई-400009 यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

31/03/2024

(अमोल शिंदे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

(अब्दुल बशर मोहीन खान)

Scanned with CamScanner

जबाब दिनांक ३१/०३/२०२१

श्री. अबुल बशर मोईद खान, वय– ४३ वर्षे, धंदा– बांधकाम कंत्राटदार, रा.ठि. उमर हाऊस, रूम न. २८, ९ तांडेल इस्टेट क्रॉस लेन, मस्जिद बंदर, मुंबई – ४००००९., मो.नं. ९८२१८२२४८०.

---

मी वरिलप्रमाणे असून वर नमुद पत्यावर मागील तीन वर्षापासून माझे कुटुंबियांसह वास्तव्यास आहे. माझा बशर कंस्ट्रक्शन या नावाने १३२, शाहीन अपार्टमेंट, ५ वा मजला, फोर्ट, मुंबई येथे ऑफीस आहे. सदर कार्यालयाची जागा मी पुर्वी काम करीत असलेल्या श्री. शाबाज खान नावाचे सोशल वर्करच्या मालकीची आहे. सदर जागा ही श्री. शाबाज खान यांनी मला कोणताही मोबदला न देता मोफत वापरवयास दिलेली आहे.

मी सन २०१० पासून मी बशर कंस्ट्रक्शन नावाने बांधकाम कंत्राटदाराचा व्यवसाय सुरू केला. त्यानंतर सन २०१० मध्ये म्हाडा कार्यालयाकडून म्हाडा अतंर्गत असलेल्या इमारती दुरूस्तींचा परवाना प्राप्त केला. मला म्हाडाच्या इमारती दुरूस्ती करण्याचा परवाना मिळाल्यामुळे म्हाडाचे अनेक इमारतीचा छोटया मोठया दुरूस्तीची व इतर किरकोळ कामे मिळू लागली. मी मस्जिद बंदर येथे राहवयास असल्याने सी.एस.टी. ते कुलाबा या परिसरातील म्हाडाच्या इमारतीच्या दुरूस्ती तसेच ट्रान्झिट कॅम्पमधील दुरूस्तीची कामे मिळणेकरीता मी सतत म्हाडा कडून निघणारे टेंडर्स भरून देत होतो त्यानुसार मला कामे मिळत होती.

कार्यकारी अभियंता, अ विभाग, यांचें कार्यालय मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ,(म्हाडा) कफ परेड, कुलाबा, मुंबई–५ या कार्यालयाचे अखत्यारीत असलेल्या ट्रान्झिट कॅम्प, कुलाबा, कफ परेड येथील ड्रेनेज वॉटर पाईप लाईन, वॉटर रिडिंग मिटर बदलने, ट्रान्झिट कॅम्प बिल्डिंगला प्रॉपींग लावणे अशी रू. ६०,०००/– हून कमी रक्कमेची ३६ कामे सन २०१९–२०२० मध्ये माझे परिचयाचे कॉन्ट्रक्टर श्री. हरीष यांना मिळालेली होती. परंतु हरिष याचे सदर कामे करणाऱ्या इसमास पॅरालिसीसचा अॅटक आल्याने श्री. हरीष यांना सदर कामे पुर्ण करणे शक्य नव्हते. त्यामुळे हरिष याने सदर कार्यालयाचे सिनिअर इंजिनियर श्री. वरूडे यांच्याशी माझी ओळख करून देवून श्री. हरिष यांना मिळालेली ३६ कामे मला देण्याबाबत विनंती केली. त्यावर श्री. वरूडे यांनी माझ्या कामाबाबत चौकशी करून मला वर नमुद सर्व कामे दिली. मी वरील सर्व ३६ कामे पुर्ण केली आहेत. वरील सर्व कामांचे एकुण बिल रू. २२,६०,०००/– इतके झालेले आहेत. त्यापैकी ८ कामांचे संबंधित कार्यालयाकडून बिल तयार करून मला एकुण रू. ५,००,०००/– इतकी रक्कम एनईएफटीद्वारे माझे बशर कंस्ट्रक्शन चे नावाने बॅक ऑफ इंडिया, डि.एन. रोड, फोर्ट येथे असलेल्या चालु खात्यात जमा झालेली आहे. उर्वरीत २८ बिलांची रक्कम मंजुर करण्याकरीता मी श्री. वरूडे यांची अनेकदा भेट घेतली. परंतु त्यांनी माझे प्रलंबित बिलाची रक्कम मंजुर केली नाही व मला सदर रक्कम मंजुर करण्याकरीता रू. १,००,०००/– इतकी रक्कम मागितली.

मला सिनिअर इंजिनियर श्री. वरूडे यांना लाचेची रक्कम रू. १,००,०००/– देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १६/०२/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष तक्रार देण्यास आलो. त्यावेळी मला अॅन्टी करप्शनचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर केले व वरिष्ठांनी माझी तक्रार ऐकूण घेवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांची नेमणुक केली व सदर कारवाई दरम्यान योग्य ते मार्गदर्शन व लक्ष देण्याकरीता सहायक पोलीस आयुक्त श्रीमती अलका देशमुख यांची नेमणुक केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी माझे हस्ताक्षरात लेखी तक्रार लिहून घेतली. मी पश्चिम बंगाल मुर्शीदाबाद जिल्हयातील असल्याने मला हिंदी व मराठी लिहिता येत नाही. परंतु दोन्ही भाषा व्यवस्थित वाचू शकतो. म्हणून मी माझी तक्रार मला येत असलेल्या इंग्रजी भाषेत जमेल तशी लिहून दिली.

मला पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी केली जाणार असल्याचे सांगितले व लगेच पंचाना बोलाविण्यात आले. काही वेळाने पंच अॅन्टी करप्शन कार्यालयात आल्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी पंच १) श्री. जितेंद्र रामचंद्र ठाकरे, वरिष्ठ लिपिक, आर.टी.ओ. अंधेरी व २) श्रीमती मिना मधुकर सोळंके, लिपिक टंकलेखक, आर.टी.ओ., अंधेरी यांची माझेसोबत व माझी पंचांसोबत ओळख करून दिली. त्यानंतर मी लेखी दिलेली तक्रार पंचाना वाचावयास देण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी मी दिलेल्या तक्रारीची मला पंच श्री. जितेंद्र ठाकरे यांचेसोबत लोकसेवकाचे कार्यालयात पाठवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. शिंदे हे मला व दोन्ही पंचाना अॅन्टी करप्शन कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील गोपनीय कक्षात घेवून गेले. तेथे पो.नि. शिंदे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्ड आणून त्यामध्ये नवीन सेल व मायक्रो एसडी कार्ड टाकून त्यामध्ये पुर्वीचे रेकॉडींग असल्याचे वाजवून दाखविले. व त्यानंतर प्रथम स्वत:चे, माझे त्यानंतर दोन्ही पंचांचे वक्तव्य रेकॉर्ड केले.

Scanned with CamScanner

त्यानंतर माझे सोबत पंच श्री. जितेंद्र ठाकरे यांना लोकसेवक श्री. वरूडे यांचे कार्यकारी अभियंता, अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, कफ परेड, कुलाबा, मुंबई–५ येथील कार्यालयात पाठवून मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर स.पो.आ. देशमुख व पो.नि. अमोल शिंदे यांनी मला पडताळणी कारवाई बाबतच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी मला तसेच पंचाना व पडताळणी पथकाला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील तळमजल्यावरील कक्षात बोलावून तेथे पडताळणी पथकातील अंमलदार श्री. गावडे व श्री. सोरटे यांच्याशी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या शासकीय वाहनाजवळ गेलो. पो.नि. शिंदे यांनी सदर वाहनाचे चालक श्री. शिवथरे यांची माझेशी ओळख करून दिली.

त्यानंतर मी, पंच श्री. ठाकरे, पो.नि. शिंदे, सपोआ देशमुख, पो.ना. सोरटे, पो.ना. गावडे असे सदर पोलीस वाहनात बसलो व पो.नि. शिंदे यांनी वाहन चालकास सदर वाहन वर्ल्डट्रेड सेंटर येथे घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे वाहन चालकाने सदर वाहन वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफपरेड येथे आणले असता, पो.नि. शिंदे यांनी गेट नं. ३ समोरच्या बाजुस रस्त्याच्या कडेला सदर वाहन थांबविण्यास सांगितले. त्याप्रमाणे चालकाने वाहन थांबविले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान करावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्ड काढून तो सुरू करून माझ्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. ठाकरे पायी चालत लोकसेवकाच्या कार्यालयात गेलो. माझी श्री. वरूडे यांचेशी भेट झाली. त्यावेळी श्री. वरूडे यांनी ते मला फोन करीत होते, फोन का उचलला नाहीस अशी विचारणा केली. त्यावर मी फोन सायलेंटवर ठेवला असल्याने समजला नाही असे उत्तर दिले असता, श्री. वरूडे यांनी त्यांना साहेबांच्याकडे अर्जंट काम आहे नंतर भेट असे मला सांगितले. तसेच माझे प्रलंबित बिलाच्या मंजुरी संदर्भात काहीही चर्चा केली नाही. त्यानंतर मी व पंच पायी चालत शासकीय वाहनाजवळ आलो. पो.नि. शिंदे यांनी माझ्या शर्टाला लावलेला व्हाईस रेकार्ड काढून बंद करून स्वतःच्या ताब्यात घेतला व मला तसेच पंचाना लोकसेवकाच्या भेटी दरम्यान काय चर्चा झाली याबाबत विचारणा केली. त्यावर मी वरील प्रमाणे माहिती दिली. त्यानंतर पोनि शिंदे यांनी सदर बाबत लोकसेवकाकडुन लाचेची स्पष्ट मागणी झाली नसल्याचे मला सांगितले. आम्ही सर्वजण अॅन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. पो.नि. शिंदे यांनी कार्यालयात येवून पुढील कार्यवाही केली.

त्यानंतर दिनांक २२/०२/२०२१ रोजी मी पुन्हा अॅन्टी करप्शन कार्यालयात गेलो. त्यावेळी पो.नि. शिंदे यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी माझे मोबाईल फोनवरून लोकसेवकास फोन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार प्रथम माझे व पो.नि शिंदे तसेच पंच श्री. ठाकरे यांचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये वक्तव्य घेण्यात आले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला माझे मोबाईल फोनवरून लोकसेवकास फोन लावून तो स्पिकरवर ठेवून बोलण्यास सांगितले त्याप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरून श्री. वरूडे यांचे मोबाईल फोनवर फोन केला. त्यावेळी मी श्री. वरूडे यांना त्यांनी सांगितल्याप्रमाणे रू. १,००,०००/– रेडी ठेवले आहेत. असे सांगितले व मी दोन चार दिवस गावाला जाणार असल्यचे सांगितले असता त्यांनी गावाला जावून आल्यानंतर नंतर भेट असे सांगितले व फोन बंद केला. त्यानतर मी दोन वेळा फोन केल्यावर श्री. वरूडे यांनी नंतर कॉल करतो असे सांगून फोन बंद केला.सदरचा कॉल हा पोनि शिंदे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर मी श्री. वरूडे यांचे कार्यालयात गेलो नाही व त्यांच्याकडून माझे प्रलंबित बिलाच्या मंजुरीकरीता मागणी केलेल्या लाचे संदर्भात फोन येतो किंवा कसे? याची वाट पाहिली. मला दि. २४/०३/२०२१ रोजी हरिष या कंत्राटदाराने श्री. वरूडे यांनी बोलाविले असल्याचे सांगितले. त्यावर मी दि. २५/०३/२०२१ रोजी श्री. वरूडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ते कार्यालयात नसल्याचे सांगितले व दि. २६/०३/२०२१ रोजी कार्यालयात असण्याची शक्यता नाही असे सांगितले.

त्यानंतर मी दि. ३०/०३/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन कार्यालयात येवून पो.नि. शिंदे यांना श्री. वरूडे यांनी बोलाविले असल्याचे सांगितले. त्यावर दि. १६/०२/२०२१ रोजी पडताळणीच्या वेळी केलेल्या कारवाईप्रमाणे कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. शिंदे यांनी सांगितले.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील आवश्यक त्या कारवाई पुर्ण करून झाल्यानंतर पो.नि. शिंदे यांनी सापळा पथकातील सर्व पोलीस अंमलदारांची माझ्याशी व माझी पोलीस अंमलदारांशी ओळख करून दिली. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार, पंच व मी असे अॅन्टी करप्शन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या



Scanned with CamScanner

त्यानंतर माझे सोबत पंच श्री. जितेंद्र ठाकरे यांना लोकसेवक श्री. वरूडे यांचे कार्यकारी अभियंता, अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, कफ परेड, कुलाबा, मुंबई–५ येथील कार्यालयात पाठवून मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर स.पो.आ. देशमुख व पो.नि. अमोल शिंदे यांनी मला पडताळणी कारवाई बाबतच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी मला तसेच पंचाना व पडताळणी पथकाला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील तळमजल्यावरील कक्षात बोलावून तेथे पडताळणी पथकातील अंमलदार श्री. गावडे व श्री. सोरटे यांच्याशी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या शासकीय वाहनाजवळ गेलो. पो.नि. शिंदे यांनी सदर वाहनाचे चालक श्री. शिवथरे यांची माझेशी ओळख करून दिली.

त्यानंतर मी, पंच श्री. ठाकरे, पो.नि. शिंदे, सपोआ देशमुख, पो.ना. सोरटे, पो.ना. गावडे असे सदर पोलीस वाहनात बसलो व पो.नि. शिंदे यांनी वाहन चालकास सदर वाहन वर्ल्डट्रेड सेंटर येथे घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे वाहन चालकाने सदर वाहन वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफपरेड येथे आणले असता, पो.नि. शिंदे यांनी गेट नं. ३ समोरच्या बाजुस रस्त्याच्या कडेला सदर वाहन थांबविण्यास सांगितले. त्याप्रमाणे चालकाने वाहन थांबविले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला व पंचाना पडताळणी दरम्यान करावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्ड काढून तो सुरू करून माझ्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. ठाकरे पायी चालत लोकसेवकाच्या कार्यालयात गेलो. माझी श्री. वरूडे यांचेशी भेट झाली. त्यावेळी श्री. वरूडे यांनी ते मला फोन करीत होते, फोन का उचलला नाहीस अशी विचारणा केली. त्यावर मी फोन सायलेंटवर ठेवला असल्याने समजला नाही असे उत्तर दिले असता, श्री. वरूडे यांनी त्यांना साहेबांच्याकडे अर्जंट काम आहे नंतर भेट असे मला सांगितले. तसेच माझे प्रलंबित बिलाच्या मंजुरी संदर्भात काहीही चर्चा केली नाही. त्यानंतर मी व पंच पायी चालत शासकीय वाहनाजवळ आलो. पो.नि. शिंदे यांनी माझ्या शर्टाला लावलेला व्हाईस रेकार्ड काढून बंद करून स्वतःच्या ताब्यात घेतला व मला तसेच पंचाना लोकसेवकाच्या भेटी दरम्यान काय चर्चा झाली याबाबत विचारणा केली. त्यावर मी वरील प्रमाणे माहिती दिली. त्यानंतर पोनि शिंदे यांनी सदर बाबत लोकसेवकाकडुन लाचेची स्पष्ट मागणी झाली नसल्याचे मला सांगितले. आम्ही सर्वजण अॅन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. पो.नि. शिंदे यांनी कार्यालयात येवून पुढील कार्यवाही केली.

त्यानंतर दिनांक २२/०२/२०२१ रोजी मी पुन्हा अॅन्टी करप्शन कार्यालयात गेलो. त्यावेळी पो.नि. शिंदे यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी माझे मोबाईल फोनवरून लोकसेवकास फोन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार प्रथम माझे व पो.नि शिंदे तसेच पंच श्री. ठाकरे यांचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये वक्तव्य घेण्यात आले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला माझे मोबाईल फोनवरून लोकसेवकास फोन लावून तो स्पिकरवर ठेवून बोलण्यास सांगितले त्याप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरून श्री. वरूडे यांचे मोबाईल फोनवर फोन केला. त्यावेळी मी श्री. वरूडे यांना त्यांनी सांगितल्याप्रमाणे रू. १,००,०००/– रेडी ठेवले आहेत. असे सांगितले व मी दोन चार दिवस गावाला जाणार असल्यचे सांगितले असता त्यांनी गावाला जावून आल्यानंतर नंतर भेट असे सांगितले व फोन बंद केला. त्यानतर मी दोन वेळा फोन केल्यावर श्री. वरूडे यांनी नंतर कॉल करतो असे सांगून फोन बंद केला.सदरचा कॉल हा पोनि शिंदे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर मी श्री. वरूडे यांचे कार्यालयात गेलो नाही व त्यांच्याकडून माझे प्रलंबित बिलाच्या मंजुरीकरीता मागणी केलेल्या लाचे संदर्भात फोन येतो किंवा कसे? याची वाट पाहिली. मला दि. २४/०३/२०२१ रोजी हरिष या कंत्राटदाराने श्री. वरूडे यांनी बोलाविले असल्याचे सांगितले. त्यावर मी दि. २५/०३/२०२१ रोजी श्री. वरूडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ते कार्यालयात नसल्याचे सांगितले व दि. २६/०३/२०२१ रोजी कार्यालयात असण्याची शक्यता नाही असे सांगितले.

त्यानंतर मी दि. ३०/०३/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन कार्यालयात येवून पो.नि. शिंदे यांना श्री. वरूडे यांनी बोलाविले असल्याचे सांगितले. त्यावर दि. १६/०२/२०२१ रोजी पडताळणीच्या वेळी केलेल्या कारवाईप्रमाणे कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. शिंदे यांनी सांगितले.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील आवश्यक त्या कारवाई पुर्ण करून झाल्यानंतर पो.नि. शिंदे यांनी सापळा पथकातील सर्व पोलीस अंमलदारांची माझ्याशी व माझी पोलीस अंमलदारांशी ओळख करून दिली. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार, पंच व मी असे अॅन्टी करप्शन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या

Scanned with CamScanner

इशारा पथकातील अंमलदारांना दिसेल अशा पध्दतीने करण्याच्या सुचना दिल्या. तसेच पंचाना सदर व्यवहार नजीक राहून पाहण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्ड सुरू करून माझे शर्टच्या आतील बाजुस लावला. त्यानंतर मी व पंच श्री. ठाकरे असे पायी चालत लोकसेवक श्री. वरूडे यांच्या कार्यालयात निघालो. आमच्या पाठोपाठ कोणाला संशय येणार यांनी अशा पध्दतीने सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार पायी चालत निघाले. त्यानंतर मी व पंच श्री ठाकरे असे श्री. वरूडे यांच्या कक्षात गेलो व वरूडे यांनी माझ्याशी माझे प्रलंबित कामासंबधित चर्चा केल्या नंतर मी त्यांना त्यांनी मागणी केलेल्या रू. १,००,०००/– रक्कमेचा बंदोबस्त केला असल्याचे सांगितले असता श्री. वरूडे यांनी सदर लाचेची रक्कम आणली आहे काय? असे विचारून ती देण्यास सांगितली असता मी सदर रक्कम श्री. वरूडे यांना दिली. त्यांनी ती घेवून परत माझेकडे देवुन त्यांच्या शेजारील खुर्चीवर ठेवलेल्या एका पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदर लाचेची रक्कमेचे खाकी पाकिट उचलुन वरूडे यांनी सांगितलेल्या पिशवीत ठेवले व काही मिनिट त्यांच्याशी इतर विषयांवर चर्चा केली. त्यावेळी श्री. वरूडे यांनी मला आभारी आहे असे म्हणून किरण नावाचे क्लार्कला बोलविण्यास सांगितले. मी किरण यास बोलावून श्री. वरूडे यांचेकडे आणले त्यावेळी श्री. वरूडे यांनी किरण यांना माझे कामाच्या कागदपत्रातील मुळ कागदपत्र व स्थळ कागदपत्र वेगळया करण्यास सांगितले. त्यानंतर मी बाहेर येवून पुर्व नियोजीत ठरलेला इशारा करून माझा चष्मा काढून बाहेर उभ्या असलेल्या सापळा पथकातील अंमलदारांना दिसेल अशा पध्दतीने माझ्या खिशात ठेवला. त्यावेळी पो.नि. शिंदे यांनी मला बाजुस बोलावून माझ्या शर्टच्या आतील बाजुस लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्ड काढून घेवून तो बंद करून स्वत:चे ताब्यात घेतला. व सापळा पथकातील अंमलदारांनी श्री वरूडे यांना जागेवरच त्याचे हात मनगटाजवळ पकडून बसून ठेवले. पो.नि. शिंदे यांना लाचेची रक्कम श्री. वरूडे यांनी कुठे ठेवली आहे. याबाबत मला विचारले असता सदर रक्कम वरूडे यांनी स्विकारून ती मला त्यांचे शेजारील पिशवीत ठेवावयास सांगितल्या प्रमाणे ठेवली असल्याचे सांगितले. पो.नि. शिंदे यांनी मला कक्षाबाहेर थांबण्यास सांगितले व पुढील कारवाई श्री. वरूडे यांचे कक्षात पुर्ण करून आम्ही सर्व पुढील कारवाई करण्याकरीता अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या कार्यालयात आला.

तरी लोकसेवक श्री. वरूडे, शाखा अभियंता, यांनी मी कार्यकारी अभियंता, अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, यांचेकडून मिळालेली ३६ कामे पुर्ण केल्यानंतर त्याव्दारे प्राप्त होणारे एकुण बिल रू. २२,६०,०००/– पैकी रू. ५,००,०००/– इतके रक्कमेचे बिल मंजुर करून उर्वरीत २८ बिलांची रक्कम मंजुर करण्याकरीता रू.. १,००,०००/– इतकी लाचेची रक्कम लोकसेवक श्री. वरूडे यांनी मागणी करून पडताळणी दरम्यान मागणी केलेली १,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केले व सापळा कारवाई दरम्यान सदर रक्कम श्री वरूडे यांनी स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. वरूडे यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा श्री. वरूडे यांचेशी कोणताही आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जवाब पो.नि. अमोल शिंदे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

31/03/2021

(अमोल शिंदे)

पोलीस निरिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी मुंबई इमारत व पुनर्रचना (म्हाडा) मंडळाचे अखत्यारीत येणाऱ्या इमारत दुरुस्तीचे व इतर किरकोळ दुरुस्तीच्या केलेल्या कामाचे प्रलंबित बिलाची रक्कम मंजूर करण्याकरीता यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादीकडे रु १,००,०००/- लाचेची मागणी करून सदर रु १,००,०००/- लाचेची रक्कम फिर्यादीकडून पंचासमक्ष स्विकारली असता लोकसेवकास लाचेचे रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून आरोपीत लोकसेवक यांचे विरुद्ध कलम ७ प्र.प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........ अमोल बबन शिंदे, पोलीस निरीक्षक ........
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No...............
to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to.................................. (3) Transferred to P. S. ..................................
District.................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 31/03/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... अमोल शिंदे ......
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक ......
तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner